

# स्किझॉस

संगीता जोशी

# स्किझॉस

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत. सूचना. टीका. विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# स्किझॉस

कवितासंग्रह

संगीता जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

# स्किझॉस (कवितासंग्रह)

संगीता जोशी

A-1. भूषण अपार्टमेंट.

11/2. कर्वेनगर. कमिन्स कॉलेजजवळ. पुणे 411052

Phone : 9665095653. 7722006363

sanjoshi729@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य. चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www. esahity.com

esahity@gmail. com

प्रकाशन : १२ जुलै २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# संगीता जोशी यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित पुस्तके

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/ye_chamanajar_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_2_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/ney_kuthehi_vadala_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mddb_dattopant_deshpande. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/bsbb_sangeeta_joshi. pdf


http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/gajhalaayan_sangita_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mulyakatha_1_sangeeta_joshi. pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/amulyakatha_sangeeta_joshi.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chhandomayee_kavita_sageeta_joshi.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/manas_sangeeta_joshi.pdf














नेऽ कुठेही
वादळा
– संगीता जोशी



उर्दू शायरीचा आस्वाद
भाग १
संगीता जोशी



उर्दू शायरीचा आस्वाद
भाग २
संगीता जोशी



संगीता जोशी
बिछडे
सभी
बारी बारी
कैफी
फिराक
साहीर


संगीता जोशी
ये
चमनजार


संगीता जोशी
गझलायन


संगीता जोशी
मूल्यकथा


संगीता जोशी
मी
दत्तोपंत देशपांडे
बोलतोय


संगीता जोशी
अमूल्यकथा

# संगीता जोशी



--ललिता जावडेकर

M. E. S. College (सध्याचे गरवारे कॉलेज)चं Annual Social चालू होतं. पेंडॉल खचाखच भरलेला होता. प्रत्येकजण आपल्याच दिमाखात, तोऱ्यात होता! आपल्या चालण्यातून, बोलण्यातून, पेहरावातून इतरांचं लक्ष आपल्याकडे कसं जाईल हाच विचार करत होता. गडबड, गोंधळ, मजा, मस्ती चालू होती. तिकडे स्टेजचा पडदा उघडला पण त्याची दखलही फारशी कोणी घेतली नव्हती. इतक्यात 'आऽ आ आ आ....' असा आलाप ऐकू आला आणि पाठोपाठ "कुहू कुहू बोलेऽ कोयलिया....." इतक्या सुंदर आणि भारदस्त आवाजात सर्वांच्या कानी पडलं आणि जादू व्हावी तसा एकदम पिन ड्रॉप सायलेन्स!! सर्वजण त्या गाण्यात गुंग झाली. 'शरद रात मन भाए प्रियतमा.... मन सानंद आनंद डो ऽ ऽ ले निरेगम धनीसा सा नी साग रेग सारे निसा धनी मधनीसा नीरे नीरे धनी धनी मध मध गम गम गमधनीसा गमधनीसा धनीसाऽऽ' गाणं संपलं अन् वन्स मोअरनं पेंडॉल हादरला!

याच संमेलनात आम्ही पु.लं.ची 'सारं कसं शांत शांत' ही एकांकिका केली होती. एकांकिका छानच झाली. पण अगदी दुसऱ्या दिवशीही सर्वांच्या लक्षात होतं ते तिचं वाक्य "स्टोव्हवर झाला पहिला चहा!" आणि ते म्हणताना तिने मारलेला मुरका!! वा, आजही मला ती डोळ्यांसमोर दिसते आहे.

फिशपॉण्ड्स् चा कार्यक्रम सुरू झाला आणि या आपल्या कलाकार मैत्रिणीला फिशपॉण्ड मिळाला, 'एम्. ई. एस्.च्या वाद्यवृंदातील सारंगी!'

ही आपली कलाकार मैत्रीण म्हणजेच तुमच्या संगीता जोशी, पूर्वाश्रमीच्या रजनी देशपांडे अन् माझी राजू!

मी कॉलेजमध्ये अगदी उत्साहाने, उत्सुकतेने प्रवेश घेतला. २० जूनला कॉलेज सुरू झालं. प्रॅक्टिकल्स एक जुलैपासून सुरू होणार होती. पण नेमकं त्याचवेळेला मला बरं नसल्याने मी दोन, तीन दिवसांनी सकाळीच प्रॅक्टिकलला गेले. प्रॅक्टिकल केमिस्ट्रीचं होतं. प्रत्येकजण आपल्या पार्टनरबरोबर आपापल्या टेबलाजवळ गेला होता. मला पार्टनरही नव्हता अन् टेबलही नव्हतं! इतक्यात ह्या बाईसाहेब आल्या. तिलाही जोडी नव्हतीच. मग आमची जोडी झाली. प्रॅक्टिकल्सना सुरूवात झाली. रोजच सकाळी ७ वाजता जावं लागे. पार्टनरला काय अडचण होती माहित नाही पण सुमारे आठवडाभर ही उशीराच येई. एकदा तर चक्क दांडीच मारली बाईसाहेबांनी! मला फार राग येई पण आल्यावर गोऽड, लाघवी बोलून ती माझा राग घालवी. तिनं काहीही केलं तरी मला तिचा राग येईनासा झाला. आमची केमिस्ट्री एकदम जमली! तिच्याबरोबर मीही तासाला दांडी मारू लागले!! आमच्या मैत्रीचे बंध इतके घट्ट झाले की, दिवसभर आम्ही एकत्र राहू लागलो. ती आमच्या घरातली अन् मी तिच्या घरची होऊन गेले. तिचा आवाज आणि गाणं आमच्या घरातलं झालं! माझे मोठे भाऊ बापू, गोरख, अरविंदा ती आली की, गाणं म्हणून घेतल्या शिवाय तिला सोडतच नसत. अरविंदा तर म्हणायचा, “राजू, फक्त एकदाच ‘बिछुआऽऽऽ’ म्हण आणि जा.” तिला सिनेसंगीत खूप आवडे. ती सर्व प्रकारची गाणी गाई. आम्ही तिच्याकडून लता, आशा यांची गाणी गाऊन घेत असू. तिला लता, आशा, मुकेश आवडे पण त्यांच्यापेक्षा तिला महंमद रफींचा दर्दभरा आवाज आवडे. कहाँ जा रहा है, चौदहवीका चाँद हो! ही गाणी ती म्हणे पण ‘राजहट’ मधलं ‘आए बहार बन के लुभाकर चले गए...’ हे गाणं फार आवडे. आम्ही दोघी क्वचित सिनेमालाही जात असू. नायक असे देवानंद! मी आणि राजूने पाहिलेला पहिला सिनेमा ‘संगदिल’, देवानंदचा!!

आता आमची खूपच गट्टी जमली होती. रोज वर्गात, पी.टी.ला एकत्रच जात असू. एके दिवशी मी दुपारी लवकरच तिच्या घरी गेले. त्यांच्या गॅलरीखाली खूप लोक जमले होते. एक दुसऱ्याला खुणेने चूप बस असे सांगत होते आणि वर बोट दाखवून, ऐक म्हणून सांगत होते. मी वर गेले तर बाईसाहेब हार्मोनियमवर ‘नागीन’ मधली पुंगी, ‘मन डोले मेरा तन डोले....’ हे गाणं वाजवत होत्या. मला खूप मजा वाटली. हा सीन त्यानंतर मी अनेकदा पाहिला!! एकमेकींकडचं जाणं येणं खूपच वाढलं होतं. अशीच तिच्या घरी गेले तर तिच्या वडिलांच्या खोलीत ते स्वतः आणि पं. भीमसेन जोशी गात होते! त्या दोघांची खूप मैत्री होती. पं.

भीमसेनजींची मैफल दत्तोपंत देशपांडे असल्याशिवाय होतच नसे. त्यांच्या साथीला दत्तोपंत हवेतच! मित्रांनो, पण पंडितजींच्या साथीला जसे दत्तोपंत बसत तसेच कधीतरी दत्तोपंतांच्या साथीला भीमसेनजीही बसत!! हे सर्व पाहिलं आणि राजूला गाण्याचा वारसा कसा मिळाला याचा उलगडा झाला. दरवर्षी सवाई गंधर्व महोत्सवाला राजूची उपस्थिती असतेच. तिच्या वडिलांच्या निधनानंतर सवाई गंधर्व महोत्सवात तिने वडिलांच्या नावे पुरस्कार देण्यास सुरूवात केली. पहिला पुरस्कार पं. संजीव अभ्यंकर यांना दिला. त्यानंतर पंडितजींचे शिष्य आणि पुत्र श्रीनिवास जोशी यांनाही हा पुरस्कार दिल्याचे मला आठवते.

आता आम्ही दोघी चोवीस तास एकत्र राहत असू. ज्या दिवशी कॉलेजमध्ये पी.टी. नसेल त्या दिवशी आम्ही अभिनव चौकातून लॉ कॉलेज रोडने सरळ B.M.C.C. वरून पुढे कॅनॉल क्रॉस करून फर्ग्युसन रोडने लकडी पुलापर्यंत येऊन कॉलेजसमोरील माझ्या घरी येत असू. एरवी आम्ही बाहेर कधीच काही खात नसू पण लॉ कॉलेजसमोरील ‘हिल व्ह्यू’ मधला साबुदाणा वडा आणि डेक्कनवरील ‘रमणीय रसवंती गृहा’तील उसाचा रस आवर्जून पीत असू.

राजूचं घर पुण्यात गणपती चौकात लक्ष्मीरोडवर एम्.आर्. घोडके मिठाईवाल्यांच्या समोरच होतं. रात्री भेटल्यानंतर आम्ही दगडू हलवाईंच्या दत्ताला जात असू. तिची खूप श्रद्धा त्याच्यावर. एकूणच ती श्रद्धाळू आहे. गणेशोत्सव असेल तर आसपासचे गणपती बघणे, तिथल्या एखाद्या चांगल्या कार्यक्रमाला हजेरी लावणे, थोडाफार अभ्यास करणे, पुष्कळदा राजू मला तिच्या कविता दाखवत असे. मी त्याचे वाचन, मनन करून समजेल त्यावर भाष्य करीत असे. मंला तिची कविता आवडे. एके दिवशी दुपारी आम्ही दोघी खरंच अभ्यास करत होतो- अन् अचानक एक उंच, धिप्पाड, थोडीशी पोटाळ व्यक्ती राजूच्या आईला हाक मारत आली. काहीतरी विनोद झाला आणि माझ्या भुवया उंचावल्या आणि माझ्या लक्षात आलं, राजूला घरासमोरच्या ग.ल. ठोकळांच्या लेखन वाचन भांडारात का जावंसं वाटतं? तिथे येणाऱ्या वि.स.खांडेकरांसारख्या लोकांशी बोलावं, भेटावं का वाटतं? शाळेत तिची मैत्री गौरी कर्वे (गौरी देशपांडे) हिच्याशीच का होती? प्राध्यापक श्री. के. क्षीरसागर सर तिच्या उत्तम निबंधाची वर्गात प्रशंसा करून हळूच तिला, ‘तुझ्यात एक लेखिका दडली आहे’ असे का म्हणत? लग्नानंतर तिने ना. सी. फडक्यांच्या ‘दौलत’ बंगल्याच्या आऊट हाऊसमध्ये घर का थांटलं असावं? या आणि अशा आणखी प्रश्नांची उत्तरे मिळाली. कारण ती आलेली व्यक्ती होती, साहित्यिक, नाटककार, समीक्षक आणि विनोदाचार्य प्रल्हाद केशव अत्रे! अत्रे राजूचे मामा!! एवढा मोठा वारसा!!!

पुण्यात कवीसंमेलन होते. त्याच्या आयोजनात तसेच कवितावाचनात संगीताबाईंचा सहभाग होता. त्या संमेलनास कवी, गायक आणि संगीतकार यशवंत देव आले होते. संमेलन संपल्यावर ते संगीताबाईंना म्हणाले, “सर्वजण मला आपले कवितांचे बाड आणून देतात. आज मात्र मी प्रथमच तुमच्या कविता मागत आहे.” संगीताने त्यांना लगेचच आपल्या कविता दिल्या. त्यातील अनेकांना देव साहेबांनी चाली दिल्या! पद्मजा फेणाणी, श्रीधर फडके यांनी त्या गायल्या आहेत!!

सायकलवरून फेरफटका मारणे हा आम्हा दोघींचाही छंद. माझ्या घरापासून तिच्या घरापर्यंत किंवा उलट, दिवसातून किती वेळा याला गणतीच नसे. पुण्यात तर आम्ही फिरतच असू पण एखाद्या दिवशी आळंदीला, विठ्ठलवाडीलाही आमची चक्कर असे. मजा होती. गप्पा मारत मारत सहज जाऊन येत असू. पण सायकलचा वेग? तिच्या आणि माझ्या घरातल्या सर्वांकडून रागावून घेतलं होतं! सर्वांची एकच सूचना असे, “वेग जरा कमी करा!”

राजूने पुण्यात स्कूटर आणि चारचाकीही याच मस्तीत चालवली आहे. आता गर्दीनं तिला ब्रेक धरायला शिकवलं आहे!

ट्युटोरियल असलं, परीक्षा जवळ आली की, आम्ही दोघी लायब्ररीत बसत असू. संध्याकाळी ७ ते रात्रौ ९-९।। पर्यंत. एकदा अशाच लायब्ररीत बसलो होतो तर राजू मला म्हणाली, “उषा, जरा चल आपण बाहेर चक्कर मारून येऊ या.” आम्ही बाहेर पडलो, इतक्यात समोरून आमच्याच वर्गातले V.S. जोशी आणि महाबळेश्वरकर (डगल्या) दोघेजण आले. आमची त्यांची ओळख झाली. त्यानंतर V.S. आम्हाला अनेकदा भेटला. त्याची आमची गट्टी जमली. त्याने आमची शरद बेलवलकर या त्याच्या मित्राशी ओळख करून दिली. पुढे V.S. ला पिलानीला इंजिनियरिंगला ॲडमिशन मिळाली, तो तिकडे गेला. राजूनेही जिऑलॉजी विषय घ्यावा म्हणून फर्ग्युसनला ॲडमिशन घेतली. शरद फर्ग्युसनसमोरच राहत असे. कॉलेज बदलल्याने आता राजूचे अन् माझे एकत्र राहणे कमी झाले. रोज भेटत मात्र असूच.

B.Sc. झाल्यानंतर राजू हिंदुस्थान ॲण्टिबायोटिक्स (H.A.) मध्ये जॉब करत असे. मध्यंतरी माझं लग्न झालं. पुढे तिचंही लग्न झालं, V.S. जोशीशी! तिच्या लग्नाला मामाच असल्याने आचार्य अत्रे तर आले होतेच पण पंडित भीमसेनजीही सहकुटुंब आले होते!रात्री पंडितजींची मैफलही रंगली!! कोणत्याही बिदागी शिवाय!!!

राजू, सौ.संगीता विश्वनाथ जोशी झाली!

लग्नापूर्वी तिने H.A.तला जॉब सोडला होता पण पुन्हा काहीतरी उद्योग हवा, आर्थिकदृष्ट्या बळकट व्हावे असं तिला वाटू लागलं आणि तिनं B.Ed. केलं. पुण्यात रास्तापेठ एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत गणित आणि विज्ञान शिकवू लागली. नुसते विषय शिकवले नाहीत तर पुणे महानरगपालिकेचा आणि भारतीय जैन संघटनेचा, 'आदर्श शिक्षिका' पुरस्कार मिळवला! आपली विषयातील सखोलता आणि शिकवण्यातील हातोटी तिने सिद्ध केली!!

सुमारे १९७८-७९त राजूने उर्दू भाषेचा अभ्यास केला. अर्थात तिच्यातल्या गझलच्या प्रेमामुळे! साधारणपणे १९८६-८७ पासून १९९३ सालापर्यंत 'मेनका' मासिकात उर्दू शायरीवर ललित लेखनही केले.

राजूची कविता/गझल आणि आमचं कुटुंब यांचं अतूट नातं आहे, जसं माझं आणि तिचं आहे. माझ्या लग्नाच्या वेळी राजूनं केलेली मंगलाष्टकं आजही तिच्या त्याच कागदावर माझ्याकडे आहेत. ती वाचताना राजूचा आवाज आजही माझ्या कानात घुमतो! आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी अश्विन आणि भूषणचा राजूच्या गझल गायनाचा 'चांदणे उन्हातले' हा कार्यक्रम झाला, ज्यात श्री. सुनील सामंत यांनी बासरी वाजवली होती, तो सर्वांनाच आठवतो. तसेच शारदा संगीत विद्यालयात माझी मुलं, सुना, नातू या सर्वांचा सहभाग होता तो कसा विसरावा? प्राची आणि टीमने सादर केलेल्या 'श्यामरंग' मध्ये कुंतीचं दुःख व्यतीत झालं ते संगीताबाईंच्या 'तुला स्मरावे...' या गीतातून! किती लिहू? आजही माझी मुलं आवडीनं आणि हक्काने ही राजूमावशीची गझल आहे म्हणून गातात!!

'म्युझिका'च्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ.मु.म.जावडेकर यांच्या हस्ते झालं आहे. त्या दिवशी श्री. भीमराव पांचाळे यांचा राजूच्या गझल गायनाचा कार्यक्रम झाला होता. जावडेकरांना संगीताच्या कविता पहिल्यापासूनच खूप आवडत असत. सेवानिवृत्ती घेऊन पुण्याला आल्यापासून ती आमच्याकडे आल्यानंतर माझ्यापेक्षा त्या दोघांत अधिक संवाद, चर्चा असते!

कोणाचीही ओळख त्या व्यक्तीच्या कुटुंबाच्या ओळखीशिवाय पूर्ण होऊच शकत नाही.

पती- श्री. व्ही. एस्. जोशी- तेरा वर्षं इंजिनीयर म्हणून सरकारी जॉब केला. तो करत असतानाच आवड म्हणून वकिलीचा (L.L.B.) अभ्यास करून परीक्षा दिली. फर्स्टक्लास मिळवला! पुढील ३८ वर्षं वकिली जुन्नर आणि पुणे येथे केली.

मुलगा- अभिजीत तथा राजेन्द्र- पॉलिमर इंजिनीयर म्हणून नेदरलँड स्थित कंपनीत. बहुभाषांचं प्रेम, आवड म्हणून पुणे विद्यापीठातून उर्दूमध्ये एम्. ए. केलं. फर्स्टक्लास, फर्स्ट!

मुंबई विद्यापीठातून पर्शियन मध्ये एम्. ए. आजही मुंबई विद्यापीठात पर्शियन शिकवतात. खेरीज मुंबई विद्यापीठाचा अरेबिक मधील डिप्लोमा केला.

मुलगा- उपेन्द्र- ५ वर्षांचा पुणे विद्यापीठाचा L.L.B. नंतर मुंबईत तीन वर्षांचा सॉलिसीटर कोर्स पूर्ण केला. आज एका कंपनीचा भागीदार आहे.

मला वाटतं इथेच संपवते.

थांबा. एक राहिलंच. समजा जर मला कोणी विचारलं, मी तुला तुझ्या आयुष्यातील दोन वर्षांचा अवधी पुन्हा जगायला देईन तर तारूण्याच्या पदार्पणाच्या मस्तीत जगलेली राजूच्या भेटीपासूनची पुढची दोन वर्षं मागेन. मला खात्री आहे राजू पण तीच दोन मागेल!

मंडळी, तुम्हा वाचणाऱ्यांपैकी अनेकांच्या वयापेक्षा आमच्या मैत्रीचे वय मोठे आहे. ती आता ज्येष्ठही झाली आहे.


फक्त ६२ वर्षांची!!!

ठाणे
ऑक्टोबर २०१९

# अर्पणपत्रिका

## कुट्ट रात्रींतून येणाऱ्या झुळूकीला अर्पण

## संगीता जोशी



होंठ पे लिए हुए, दिल की बात हम

जागते रहेंगे और, कितनी रात हम

…गुलजार

एक....

अशी झोपी जातांनाच

का ग येत असतेस ?

उजेडात शोधलं तर

कधी कुठे नसतेस !....1

कधी कधी दिसतो नुसता

लाल-पिवळा झगा

हवेत जातो वर...वर...

साबणाचा फुगा.....2

इंद्रधनुष्याचे रंग

पकडायला का जातेस ?

बघता बघता सावरीसारखी

हलकी हलकी होतेस !...3

कशी कुठे हरवतेस ग,

पापण्यांच्या आड ?

डोळे उघडले की फक्त

वाळलेले झाड ! ....4

*********

दोन....

अग ! आता ऊठ सये

उन्हं आली वरती

कपाशीच्या गाठींनाही

चाकं लागली फिरती.....1

ऐकू येताहेत बैलांचे

खुळखुळ घंटानाद

पिंजऱ्यामधल्या पोपटाचीही

ओळखीची साद....2

अजून नाही झालं तुझं

स्वप्नवेडं वय

सतारीला कळायचीय

त्रितालाची लय....3


ग आणि म यांचा

शब्द नाही झाला

तू आहेस अर्धकळी

मुग्ध अशी बाला.... ! 4

*********



तीन....

कुणीतरी म्हटल्या कानी
कवितेच्या ओळी
सुटी सुटी होते आहे
एकजुटलेली मोळी.....1
घटामधले दूध लागे
अधिकाधिक गोड
घेऊन चल नं,  गडे मला
मागे मागे सोड....२
पाटीवरची अक्षरे ती
गिरवायला हवीत ना
चिमणीच्या उजेडात
गोष्टी सांग, ये ना....३
वाट पाहतांना गेले
पार थकून डोळे
तेवढ्यातच कोपऱ्याला
कुणीतरी वळे.... ! ४

*********

चार.....

किती साधी किती भोळी
बटा सार मागे
परकराचा काचा मारून
जा ठिकरीच्या मागे....1
सागरगोटे म्हणजे नव्हेत
समुद्राताले दगड
पाचखै झाली तर मग आता
हंडीसाठी झगड......2
विटी-दांडू, गोट्या-पतंग
मुलांचे हे खेळ
तू आपली एक लिंबू
पाच लिंबं झेल....3
बरं, आता अंधार पडला
बाहेर नाही राह्यचं
दिवेलागण झाली आता
पाटपाणी घ्यायचं !....4

*********

पाच.....

कुणी बरं ओळखलं की
          गोड तुझा गळा  ?
तुझा बाप माझा सखा
          म्हणून लावला लळा....1
सांगितलं की उद्यापासून
          सूर तुझे मित्र
तेच राहतील बरसत, आणि
          तेच धरतील छत्र....2
उलगडतच गेल्या नंतर
          रेशमाच्या लडी
संगीताच्या गणेशाला
          स्वरांची ही जुडी !....3

*********

सहा......

कळलं नाही, कधी कसे

शब्द लागले खेळू

शोभादर्शक रंगित, तसे

आपोआप लागले जुळू....1

आला होता ऋतू वसंत

गंध-फुले घेऊन

कागदावरती काही-बाही

गेला छान लिहून.....2

कौतुकाच्या पाकळ्यांना मग

पुरलं नाही अंगण

शब्द झाले खूष, त्यांची

नवी नवी गुंफण....3

*********

सात......

अचानक ठरलं की हा

सोडून जायचा गाव

साऱ्या खुणा पुसून तिथून

काढून घ्यायचं नाव.....1

तेव्हा सगळे सैल झाले

शैशवाचे बंध

लय राहिली मागे, सारे

मागे राहिले छंद....2

कोपऱ्या कोपऱ्यावरती दिला

फेकून एकेक साज

तेव्हा ‘काल’ कालचा झाला

त्याला जोडला आज....3

सांधे बदलतात तेव्हा

कुरकुरणारच नाती

स्निग्धन केलं तरीसुद्धा

भरडून काढतात जाती !....4

*********

## आठ.....

डबक्यामधून तळ्यात येताच

काय म्हणेल मासा ?

सारं पाणी सारखीच हवा

पुरवीत रहातं श्वासा.....1

मोठं पाणी म्हणून काय

छाती मोठी होणार ?

तेवढेच ओठ, तेवढाच घोट

तेवढीच तहान लागणार !...2

सारे मासे मित्रच जसे

रंग लागले खुलू

कोवळ्या कोवळ्या हृदयात मात्र

काही लागले सलू !.....3

*********

नऊ.....

कळतंय मला, अबोल झालीस
पण मन गेलंय् उतू
निसर्गानंच दिलाय तुला
वरदान म्हणून ऋतू.....1
फुलंच फुलं फुलली तरी
वेडं नाही व्हायचं
गंध उरात जपून ठेव
उधळत नाही जायचं.....2
लपून तरी कसं राहील ?
कळी फूल झाली !
आता कुंपण पडणारच गं
कठोर असतो माळी !.....3

*********

दहा.....

ओठांवरची स्मितं अवखळ

फुलपाखरांचे थवे

चंद्रस्वप्नं नवी, रोजचे

सूर्यकिरण नवे.......1

काहीतरी बरसू लागलं

मधाळ आतल्या आत

छतावरती इंद्रधनू

रंग अधिक सात.....2

मनामधल्या डहाळीवर

पक्षी बसू लागला

आरसादेखील भलतं-भलतं

सांगून हसू लागला....3

*********

## अकरा

एकेक करून मोजता मोजता
पाऊस झाले सोळा
प्रियंवदा सुहासिनी
सखी झाल्या गोळा.....1
किल्बिल करता करता नकळत
कुजबूज झाली सुरू
काहीतरी हरवल्यागत
मन लागलं झुरू....2
तंबोऱ्याची तारसुद्धा
झंकारून उठली
षड्जालाही पंचमाची
ओळख जणू पटली....3
खर्जामधे तरळत राहिला
मात्र एक अश्रू
कुठला सूर आठवू नि
कुठला नेमका विसरू ?....4

*********

बारा—

एके दिवशी एक सकाळ

वर्षाव घेऊन आली

कोवळी वेल आकाशाच्या

निळ्या रंगात न्हाली....1

बघता बघता एकामेकात

मिसळून गेले रंग

सारं जग विरघळून गेलं

मन झालं  दंग.....2

ऊन झालं मखमलीचं

चांदण्याची रात्र

विनाकारण उमलून आलं

प्रत्येक गात्र गात्र....3

हृदयाशी जपून ठेवलं

कागदावरचं स्वप्न

उत्तराला शब्दच नव्हते

सारेच गोड प्रश्न !....4

*********

## तेरा--

रक्तामधल्या संगीताला

सुचलं नवं गीत

सुरांनीही सांगून टाकली

मनामधली प्रीत....1

चंद्र-सूर्य तारे तेव्हा

हातात आले क्षणात

काळ मात्र थांबून राहिला

हसत असेल मनात.....2

चोरू दिले खुशाल त्याने

दिवसामागून दिवस

साऱ्या रात्री पौर्णिमेच्या

एकही नव्हती अवस....!..3

चंद्र होता सागर होता

सतत होती भरती

नकळत आली  एकच लाट

मागे मागे सरती....4

*********

चौदा--

तिनं म्हटलं, माझं प्रेम
न सांगता ओळख
कळी उमलल्याची असते
भुंग्यालाही पारख....1

बोलला नाहीस; सूर्यकिरण—
पुडीत दिलेस बांधून
उलगडल्यावर ती निघाली
प्रकाशात न्हाऊन....2

एक शीळ घरंगळत
सज्जाखालून गेली
जाता जाता तिची मुकी
स्वप्नेसुद्धा नेली....3


बधीर झाले नंतर कान
ऐकू ये ना शीळ
सगळा नुस्ता गुंता उरला
निसटून गेलं रीळ...4

*********

पंधरा---

सागरप्रवास ! एका नावेत
तीन जीव बसले
शीड नाही, वल्ही नाहीत
वादळ मनात हसले....1
कोण कुणाला वाचवणार?
अन् कोण हात देणार?
प्रश्न होता अवघड !...उत्तर?
सगळेच जीव बुडणार !....2
नियतीपाशी सत्ता होती
वादळ होतं क्रूर
तीन जीव फेकले गेले
किनाऱ्यावर दूर....3
रेतीवरल्या रेघांसारखी
पुसून गेली नाती
उरलेल्या त्या स्मृती कसल्या ?
---करवतीची पाती ! !....4

*********



सोळा---

सारं संपतं तेव्हादेखील
काही असतं बाकी
तू फक्त खेळायचं
फासे ‘तो’ टाकी....1


आता नव्या चौकोनात
सरकलं हे पाहिजेच
इच्छा नसली तरी त्याची
मर्जी राखली पाहिजेच...2

तो म्हणाला, पुस्तकातही
बुडवून घेता येतं
तू म्हणालीस, मेलं मन
कधी श्वास घेतं ?...3

उदास उदास राहिलीस आणि
वेढून घेतला अंधार
सूर झाले होतेच मुके
तुटून गेली तार-तार....4

नेमका तेव्हाच उन्मळून पडला
आधाराचा वड
फक्त चिंध्या उरल्या हाती
भाराभर, एक ना धड...!.


*********



सतरा---

जुनं घर पडलेलं,
लिंबाचं झाड पडलेलं
जवळ, मातीच्या ढिगाखाली
कोवळं बालपण गाडलेलं...1
पुढल्या पाचव्या वळणावरती
जुनं मंदिर शिवाचं
कुणीतरी सार सांगतंय्
कुठल्या पवित्र ग्रंथाचं....2
तिथं देखील जाऊन तिनं
शोधला जुना गोड सूर
स्वतःपासून गेली होती
ती तर आता फारच दूर....3

*********



अठरा---

आता तरी कळलं तुला ?

जगण्यासाठी पैसा हवा

भुकेसाठी भाकरी हवी

चालत नाही नुसती हवा !....1

आता काही लहान नाहीस

उगाच काही मागायचं नसतं

समंजस अशा कठपुतळीनं

दोरीनुसार वाकायचं असतं....2

समजून घे, जरी कोणी

तुला नाही समजून घेतलं

तुझं मन प्रत्येकानंच

त्याला हवं तसं बेतलं....3


वेढून टाकील जीवन असा

निराशेचा झाकोळ आला

चिवडलेल्या आकांक्षांचा

फक्त एक गोपाळकाला !....4

*********



एकोणीस---

पहिल्यांदाच खेळलीस आणि

नाव मात्र ‘आखरी दाव’

शब्दांवरती स्वार झाले

मनामधले सगळे भाव....1

तुझं जीवन म्हणजे फक्त

त्याची एक नजर

तेवढीच देऊन, करशील ना रे

आयुष्याची कदर ?....2

फक्त प्रश्न !...नव्हती उत्तरं

आंदोलनं मनात

काळ रोज सांगत होता

वेगळंच काही कानात....3

पाऱ्यासारख्या अस्थिरतेतच

वळण केलं पार

कधी कधी मौन देखील

करून जातं वार !.....4

*********

वीस---

कशासाठी स्त्री-पुरुष ?

कशासाठी लग्न ?

सौख्य रहातं दूर उभं

दुःख उरतं भग्न !....1

मनोमीलन नसलं तरी

मुलं मात्र होणार

पौरुषत्व स्त्रीत्वाला

ओरबाडून घेणार !....2

तरीसुद्धा कुठेतरी

मनात असते ओढ

जगणाऱ्याला मारायचं ही

निसर्गाची खोड.....3

प्रेम सोड, आपणही

करून पाहू लग्न

जरूर नाही प्रत्येक व्यक्ती

होईलच छिन्न !...4

मागताक्षणी आढळलं एक

मनासारखं प्रेय

मग तीच झाली जिद्द

आणि तेच झालं ध्येय !.....5

*********

एकवीस---

नाव नाही गाव नाही

देऊन टाकलंस मन ?

खुशाल उधळून टाकलंस कसं

हृदयामधलं धन ?....1

कशाचाही विचार नाही

फक्त एकच ध्यास

संपत आली वर्षं आणि

उरले दीस-मास....2

आतल्या देवा वाह्यलं पाहिजे

अनाघ्रात फूल

एकतर्फी प्रेम म्हणजे

केवळ एक खूळ....3


कसातरी तिळामधून

स्नेह साकार झाला

उत्तरायण आलं तसा

ताप वाढू लागला !...4

*********



बावीस---

एक होता पक्षी त्यानं
आणलं पहिलं पत्र
शब्द त्यात होतेच कुठे
मोहवणारं चित्र !....1

प्रश्न पडला, स्पंदनांची
वारंवारता मोजू ?
की मन मोकळं होण्यासाठी
संकोचाला त्यजू ?...2

अशी कोणती शक्ती होती ?
खेचून आणलेस मेघ !
तूच तुझी कोरून घेतलीस
तळहाती रेघ !.....3

*********

तेवीस---

ऋतूचक्र फिरत राहतं
पालवी होते जून
सावलीसाठी हवंच ना ते
तळपणारं ऊन ?....1

उन्हामधे अक्षरांचे
घोस आले फुलून
कॅशियाशी जॅकॅरांडा
बोलत राहिला हसून...2

वेगवेगळे सुखद रंग
ओघळत राहिले उरात
दुरून आले सूर कानी
गीत रंगलं मनात...3

ध्रुवांना मग जोडत राहिली
वाऱ्यावरची  पत्रं
कोऱ्या कॅनव्हासवरती नवं
उमटत होतं चित्र !....4

*********

चोवीस---

रस्ते नसतात सरळ
त्यांना जागोजागी वळण
भाजून निघतात, फुलतात पाय
अशी तप्त पुळण....1

कडेकडेनं आपल्यासाठी
कुणी लावतं झाडं
कधी उभे पाठीशी तर
जरूर तेव्हा पुढं....2

मैत्रीच्याच बोटामुळे
सहज होतात वाटा
शिडकाव्याला अधून मधून
येत राहतात लाटा...3

गोफ गुंफले जातात, होतो
दुराव्याचा लोप
खोलवर रुजत जातं
फोफावलेलं रोप....4

मधेच कुठे विसाव्याला
मांडवही सजतात
हळूच कधी कानापाशी
सिल्व्हर बेल वाजतात..!...5

*********

पंचवीस---

तुलसी म्हणतात, प्रेम म्हणजे
जसं झाड खजूर
सावली देत नाहीच नाही
फळंदेखील दूर...1

ज्यानं म्हटलं प्रेम म्हणजे
शिक्षा असते फक्त
त्यानं केवढं सोसलं असेल
वाहिलं असेल रक्त....2


तुला मात्र प्रेम म्हणजे
एक स्वप्न वाटलं
डोळे उघडताक्षणी
आपोआप मिटलं....3

ओल्या झाल्या तिन्हीसांजा
चंद्र झाला फिका
अंधाराला माहीत होतं
कशा झाल्या चुका...4

पहाटेला कळया आल्या
    आणि फुलं फुलली
मरगळलेली वेल थोडी
    उमेदीनं झुलली....5

शिशिरामागून नंतर पुन्हा
    शिशिर येत राहिला
किती पानं गळली-ढळली;
    हिशेब नाही केला....5

*********



सव्वीस---

एक होता पक्षी त्याचे
राजवर्खी  पंख
घरट्यात त्याने जमवलेले
मोती, शिंपले शंख....1

तुला पंख फुटले तसा
सोबत घेऊन गेला
अलीबाबाच्या गुहेचेच तो
दार खोलून गेला....2

आनंदाचा खजिना झाला
तुझ्यासाठी खुला
आकाशावर बांधून दिला
त्यानं एक झुला....3

उंचावरून खुडून आणले
शब्द आणखी सूर
म्हणलीस, यांनी जाऊ नये
कधीच पुन्हा दूर....4

*********

सत्तावीस---

किती ऋतू मावळले, अन्
          किती सरली वर्षं
विसरू शकली नाहीस ना तो
          प्रकाशाचा स्पर्श ?...1
पोपटी बहर आल्यावरचं
          पहिलं वहिलं गाणं
कोकिळेला शक्य झालं
          कधी विसरून जाणं ?.....2
पहिलं वहिलं दान मात्र
          देवालाच द्यायचं
दुसरं जे काय मिळेल ते
          आपल्या झोळीत घ्यायचं.....3

*********

## अठ्ठावीस---

पायाखालचा रस्ता त्याला
    फुटल्या दोन वाटा
हाती नाणे नव्हतेच तर
    कुठला छाप किंवा काटा....1
चालता चालता कळलं
    कधी छाप कुठेच् नसतो
वाटेत नाही, काटा नेहमी
    पायाखालीच असतो.....2
पलीकडची हिरवळ फक्त
    पाहात जायचं असतं
तळ्यामधलं कमळ कधीच
    खुडण्यासाठी नसतं....3
आपणच निडलेल्या
    वाटेवरून चालायचं
मागे काय राहिलं, मुळीच
    वळून नाही पाहायचं...4

*********


एकोणतीस...

चिमणे तुझा समज की तू
पेललं आहेस सारं आकाश
तूच जणू रोखला आहेस
या जगाचा सर्वनाश...1

तुला वाटलं, पंखांमुळे—
जगावर तू धरलंय् छत्र
कोसळलं तर इजा पोचेल
तुझा परिवार...तुझे मित्र......2

हलली नाहीस, चिवचिवली नाहीस
उडणं बिडणं राह्यलं दूर
किती काळ लोटला तरी
तू तुझ्या काळजीत चूर....3

धन्य तुझी ! तग धरलास...
शेवटी सरलं अवघं त्राण
पंख थकले, डोळे थिजले
कंठापाशी आले प्राण....4




पडता पडता ऐकलंस ना तू ?
जग काय म्हणत आहे ?
वेडी चिमणी ! आमच्यासाठी
अजून कशाला कण्हत आहे?....5

तिला काय वाटलं ? आम्ही—
तिच्या पंखाखाली आहोत ?
आम्हीच आहोत आमचे रक्षक
आम्हीच आमचे वाली आहोत...6

चिमणे, तुला मरता मरता
सत्य नक्की असेल कळलं
भ्रमातच तू जगलीस ...मेलीस..
तुझंच नाही का सारं चुकलं..?....7

*********



तीस----

मुक्त गझल

आता केवळ एकच कर

तू सत्याचीच कास धर....1

अहिंसा हा ठरतो गुण

पण तू सिंह असशील तर !....2

कोणी चुका केल्या तरी

शिक्षा ही की माफच कर.....3


झालीस तू कंगाल अता

संपले ना मोत्यांचे सर ?....4

रोजचे मरणे जमत असेल

तर मग प्रेम खुश्शाल कर !!....5

*********



दिल बहल तो जायेगा, इस खयालसे
हाल मिल गया तुम्हारा, अपने हालसे
...गुलजार

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष. संगीता जोशी यांचे हे सोळावे पुस्तक.**

सांप्रत मराठी कविता आणि विशेषतः मराठी गझलच्या रसिकांना संगीता जोशी यांची नव्याने ओळख करून द्यायची गरज नाही. मराठीतील त्या पहिल्या महिला गझलकारा. २००४ सालच्या अमरावती येथील मराठी गझल संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांची आजवर प्रसिद्ध झालेली म्युझिका. वेदना संवेदना. चांदणे उन्हातले, मराठी गझल, नजराणा शायरीचा भाग १ व २, ती भेटते नव्याने अशी अनेक पुस्तके रसिकांच्या मनात स्थान करून आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. अनेक सभा, मैफ़ली व संमेलनांतून त्यांनी आपले काव्य सादर केले आहे. टिव्ही मालिका, ध्वनीमुद्रिका यांतून त्यांची गीते प्रसिद्ध झाली आहेत. गेली पन्नास वर्षांहून अधिक काळ त्या लिहीत आहेत. संगीता जोशींसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात.

मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (आठ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२५ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (१२ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (५ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५),

ई
सा
हि
त्य
प्र
ति
ष्ठा
न

सुजाता चव्हाण (८), नंदिनी धारगळकर(१०) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात.

एकही पैशाची अपेक्षा न ठेवता. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।